शाहूपूरी पोलीस स्टेशन जि.सातारा

फोन ०२१६२-२५२३३३

Email- pishahupuri.satara@mahapolice.gov.in




दिनांक - ३०/११/२०२५

**प्रेस नोट**

**( सातारा नगरपालिका निवडणुक-२०२५ पार्श्वभूमीवर शाहुपूरी पोलीस स्टेशन हद्दीतील ७६ उपद्रवी इसमांना सातारा पोलीसांनी केले मनाई आदेश जारी )**

दि.०१/१२/२०२५ रोजी ते ०३/१२/२०२५ रोजी सातारा नगरपालिका निवडणूक २०२५ या कालावधीमध्ये संपन्न होणार असून सदर निवडणूका हा निर्विघ्न पार पाडणेसाठी मा.पोलीस अधिक्षक सो सातारा श्री तुषार दोशी तसेच मा.अपर पोलीस अधिक्षक सो सातारा श्रीमती डॉ.वैशाली कडुकर यांनी सातारा नगरपालिका निवडणूक २०२५ ही निर्भयपणे पार पाडणे करिता सराईत गुन्हेगार व हद्दीतील उपद्रवी इसमांचेवर योग्य ती प्रतिबंधक कारवाई करणे बाबत आदेशीत केले होते.

सातारा नगरपालिका निवडणूक २०२५ या निवडणूकीच्या पार्श्वभूमिवर मा.उपविभागीय पोलीस अधिकारी सातारा विभाग सातारा श्री राजीव नवले सो यांचे मार्गदर्शनाखाली शाहुपूरी पोलीस ठाणेचे पोलीस निरिक्षक श्री सचिन म्हेत्रे यांनी शाहुपूरी पोलीस स्टेशन हद्दीतील खंडणी मागणे,बेकायदेशीर जमाव जमवून गर्दी मारामारी करणे,गर्दीचा फायदा घेवून चोरी करणे,जबरी चोरी करणे,बेकायदेशीर हत्यार जवळ बाळगणे,तसेच संगणमत करून शिविगाळ दमदाटी करून गंभीर दुखापत करणे,जिवे मारण्याची धमकी देणे या सारखे गुन्हे करण्याची सवय असनारे इसम तसेच जामिनावर मुक्त झालेनंतर त्याचेवर योग्य ती प्रतिबंधक कारवाई करून ही त्याचेवर काहीएक परिणाम झालेला दिसत नाही अशा प्रकारच्या इसमांविरूध्द शाहुपूरी पोलीस ठाणेचे पोलिस निरिक्षक श्री सचिन म्हेत्रे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहीता अधिनियम २०२३ चे कलम १६३(२) प्रमाणे एकूण ७६ इसमांचेवर कारवाई होणेकामी मा.विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक सो सातारा यांचेकडे शिफारस केली होती.

मा.पोलीस अधिक्षक सो सातारा श्री तुषार दोशी यांचे मार्गदर्शनाखाली मा.विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक सो श्रीमती वैशाली कडुकर सातारा यांनी **भारतीय नागरिक सुरक्षा संहीता अधिनियम २०२३ चे कलम १६३(२) प्रमाणे एकूण ७६ इसमांना दि.०१/१२/२०२५ रोजी चे ००.०१ वा ते दि.०३/१२/२०२५ रोजीचे २४.०० वा पर्यंत शाहूपूरी,सातारा शहर,सातारा तालूका पोलीस स्टेशन हद्दीत वावर करू नये/थांबू नये** तसेच नमुद इसमांना **दि.०२/१२/२०२५ रोजीचे सकाळी ०७/३० वा ते ०९/३० वा (२ तासांचा कालावधी)** पर्यंतचा मतदानाचा हक्क अबाधित राखून भारतीय नागरिक सुरक्षा संहीता अधिनियम २०२३ चे कलम १६३(२) नुसार मनाई आदेश पारित केले आहे.

प्रति,

संपादक,

सर्व वर्तमानपत्र